# मिलिंद विज्ञान महाविद्यालय, नागसेनवन औरंगाबाद
# आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## <u>वार्षिक अहवाल २०१७-१८</u>

### महाविद्यालय स्तरावरील उपक्रम

**१) दिं.१ जूलै २०१७-**

या दिवशी सर्व स्वयंसेवकांनी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण केले व महाराष्ट्र शासनाच्या महत्वकांक्षी २ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमास हातभार लावला. यामध्ये नारळ, अंबा वृक्षांची लागवड करण्यात आली.

**२) दिनांक २१ जून आतंरराष्ट्रीय योग दिवस –**

महाविद्यालयातील आजीवन विस्तार केंद्राचे सर्व स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत आतंरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी श्री.व्हि.टी.चामले, डॉ.एम.पी.कुलथे यांनी योगाची विविध अंगे प्रतिपादीत केले व प्रात्यक्षिक करुन घेतले.

३) **दि. २४ जुलै २०१७ रोजी** विस्तार कार्यात सहभागी होण्यासाठी स्वंयसेवक विद्यार्थ्यांची नोंदणी सूरु केली. एकुण ५० विद्यार्थ्यांनी नोंद केली.

**४) दिं.१६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१७ –**

स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहिम राबविली व जनजागृति केली.

**५) दिं.२३ ऑगस्ट विद्यापीठ वर्धापन दिन –**

विद्यापीठ वर्धापन दिना निमित्त ध्वजारोहण झाले. स्वयंसेवकांनी परिसरातील स्वच्छता केली.

६) **दिं.२९ ऑगस्ट २०१७** - महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचा-यांसाठी डॉ.नागवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली अॅक्युप्रेशर शिबीराचे आयोजन करण्यात आले.

७) **दिं.८ संप्टेबर २०१७** - आजीवन शिक्षण विस्तार विभाग, डॉ.बा.अ.म.वि. कार्यक्रम अधिकारी यांच्या बैठकी मध्ये सहभाग नोंदवीला.

८) **दिं.१७/०९/२०१७ - मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन -**

या प्रसंगी स्वयंसेवक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले. मा.प्राचार्य डॉ.महंमद शफीक यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे महत्व विशद केले.

९) **दिं.०७/११/२०१७** — विद्यार्थी दिना निमित्त डॉ.आरविंद गायकवाड यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते.

१०) **दिं.१३/११/२०१७** - माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन दिन म्हणून साजरा करण्यात आला. या निमित्ताने डॉ.अविनाश डोळस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**समाज स्तरावरील उपक्रम**

१) **दिं.०८ संप्टेबर २०१७** आतंर राष्ट्रीय साक्षरता दिना निमित्त आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, मा.आमदार श्री.इम्तीयाज जलील यांनी व्यसन मुक्तीची शपथ विद्यार्थ्यांनां दिली. व युवकांनी व्यसन मुक्त होऊन बलशाली भारत बनवावा असे या प्रसंगी सांगिताले.

२) **दिं.०६ ऑक्टोबर २०१७** रोजी मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद, रा.से.यो. विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वच्छता मोहिम मिलिंद विज्ञान महाविद्यालय व सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी मकई गेट परिसर ते बिबी का मकबरा या कार्यक्षेत्रात राबविली. या मोहिमेचे उद्घाटन मा.प्राचार्य डॉ.महंमद शफीक व सहसंचालक, मा.धामनस्कर यांनी केले. मिलिंद विज्ञान महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार सेवा योजनेचे विद्यार्थ्यांनी हिरीरीने सहभाग घेतला. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग औरंगाबाद, यांच्या कार्यलयातील कार्यालयीन कर्मचारी मोठया संख्येने या मोहिमेत सहभागी झाले.

३) **दि.२६ नोव्हेंबर २०१७** रोजी संविधान दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्राचार्य डॉ.महंमद शफीक यांनी भारतीय राज्यघटनेचे महत्व आणि आवश्यकता संबंधी मार्गदर्शन केले. राज्यघटनेच्या प्रियअंबलची विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शपथ देण्यात आली.

४) **दिं.६ डिसेंबर २०१७** रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वान दिना निमित्त डॉ.राजेश रगडे व अँड.गायकवाड यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले.

## ‘विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व निवड’ दोन दिवशीय समुपदेशन व व्यक्तिमत्व शिबीर

**दि.०८ व ०९ जानेवरी २०१८ रोजी** आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व विस्तार केंद्र आणि मिलिंद विज्ञान महाविद्यालय अतंर्गत दोन दिवसीय **‘विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व निवड’** आयोजन करण्यात आले.

### दि.०८ जानेवारी २०१८

**सत्र पहीले –**

या कार्यक्रमाचे **उद्घाटन प्रा.डॉ.संजय मुन,** विभाग प्रमुख, आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांनी आपल्या बीज भाषणात सांगतांना विद्यार्थ्यांना आजीवन शिक्षण विस्तार सेवा योजनेचे महत्व समजावून सांगीतले. तसेच भारतीय शिक्षण पध्दती व पाश्चात्य शिक्षण पध्दती याच्यातील फरक सांगीतला. तसेच डॉ.अब्दूल कलाम यांच्या व्हिजन २०२० वर प्रकाश टाकला. तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी ध्येय निश्चिती व ध्येय प्राप्ती कशा प्रकारे साधता येईल या विषयावर विषयावर मार्गदर्शन केले.

**सत्र दुसरे -**

**श्री.महेश अष्ठपुत्रे, उद्योजक – सौर उर्जेतून स्वयं रोजगाराची निर्मिती -**

यांनी सौरउर्जा या क्षेत्रामधील रोजगाराची संधी यावर दृकश्राव्य माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**सत्र तिसरे –**

**डॉ.सुरेखा जाधव, प्राचार्या,** महिला कला महाविद्यालय,हर्सुल, औरंगाबाद - **समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वत:च्या प्रगतीसाठी स्वत:मधील नकारात्म गुण कमी करुन स्वत:चा विकास करावा.

**दिनांक ०९ जानेवारी २०१८**

**प्रथम सत्र -**

**डॉ.पुरुषोत्तम देशमुख, अर्थशास्त्र विभाग,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी स्वतःमध्ये आत्मविश्वास तसेच व्यक्तिक देह बोली योग्य असावी असे सांगीतले.

**डॉ.सादीक बागवान, समाजशास्त्र विभाग,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांनी स्पर्धा परिक्षेची तयारी करत आसतांना वेळेचे नियोजन योग्य प्रकारे करावे व त्या सबंधी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

**सत्र तिसरे -**

**मा.डॉ.कृष्णा भोगे, भोगे** - करिअर डेव्हलफमेंट ॲकॅडमी, औरंगाबाद सरांनी विद्यार्थ्यांना **'स्पर्धा परिक्षा एक चिंतन'** या विषयावर मार्गदर्शन केले. सरांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा म्हणजे काय... याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कुठल्याही परिक्षेची तयारी करतांना आगोदर ध्येय निश्चीत करावे व त्या दृष्टीने वाटचाल करावी म्हणजे यश लवकरात लवकर मिळेल. पदवी शिक्षणा दरम्यान स्पर्धा परिक्षेची तयारी कशी करावी वेळेचे व्यवस्थापन कसे ठरवावे.. स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना अभ्यासामध्ये नेहमी सातत्य असावे, एखादया वेळेस अपयश आले तर खचून न जाता प्रयत्न चालू ठेवावे व तसेच नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा. माणसाची निर्णय घेण्याची क्षमता उत्कृष्ठ असावी असे त्यांनी या वेळेस सांगितले

**समारोप समारंभ - अध्यक्ष प्र.प्राचार्य महमंद शफीक** यांनी या प्रसंगी समारोप भाषणात सांगितले की, गुणवत्तापुर्ण शिक्षण घेतांना व्यक्तिमत्व विकास साधावा. व स्वतःचे व्यक्तीमत्व चांगल्या प्रकारे घडवून देशाचा उत्तम नागरीक बनावे. शेवटी सहा विद्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या आवश्यकते संबंधी आपले मत व्यक्त केले.

(डॉ.आर.एस.यन्नावार)
कार्यक्रम अधिकारी
आजीवन व विस्तार विभाग
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

PROGRAMME OFFICER
DEPT OF LIFE-LONG LEARNING
& EXTENSION
MILIND COLLEGE OF SCIENCE
Nagasenvana, Aurangabad.

(डॉ.एस.डी.राठोड )
प्र.प्राचार्य
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

PRINCIPAL
MILIND COLLEGE OF SCIENCE
AURANGABAD.

# मिलिंद विज्ञान महाविद्यालय, नागसेनवन औरंगाबाद
## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग
### वार्षिक अहवाल २०१८-१९

**महाविद्यालय स्तरावरील उपक्रम**

**१) दिनांक २१ जून आतंरराष्ट्रीय योग दिवस –**

महाविद्यालयातील आजीवन विस्तार केंद्राचे सर्व स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत आतंरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ.एम.पी.कुलथे, डॉ. आर.एस.यन्नावार यांनी योगाची विविध अंगे प्रतिपादीत केले व प्रात्यक्षिक करुन घेतले.

**२) दिं.१ जूलै २०१८-**

या दिवशी सर्व स्वयंसेवकांनी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण केले व महाराष्ट्र शासनाच्या महत्वकांक्षी ३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमास हातभार लावला. यामध्ये नारळ, अंबा वृक्षांची लागवड करण्यात आली.

३) **दि. २४ जुलै २०१८ रोजी** विस्तार कार्यात सहभागी होण्यासाठी स्वंयसेवक विद्यार्थ्यांची नोंदणी सूरु केली. एकुण ५० विद्यार्थ्यांनी नोंद केली.

**४) दिं.१६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१८ –**

स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहिम राबविली व जनजागृति केली.

**५) दिं.२३ ऑगस्ट विद्यापीठ वर्धापन दिन –**

विद्यापीठ वर्धापन दिना निमित्त ध्वजारोहण झाले. स्वयंसेवकांनी परिसरातील स्वच्छता केली.

६) **दिं.८ संप्टेबर २०१८** - आजीवन शिक्षण विस्तार विभाग, डॉ.बा.अ.म.वि. कार्यक्रम अधिकारी यांच्या बैठकी मध्ये सहभाग नोंदवीला.

७) **दिं.**२६ संप्टेबर २०१८ रोजी आजीवन शिक्षण विस्तार विभाग, डॉ.बा.अ.म.वि. येथे एक दिवसीय कार्यशाळेत कु.दिव्या भगत व कु.काळबांडे नेहा या विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला.

**८) दिं.१७/०९/२०१८ - मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन -**

या प्रसंगी स्वयंसेवक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले. मा.प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे महत्व विशद केले.

९) **दिं.१३/११/२०१८ -** माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन दिन म्हणून साजरा करण्यात आला. या निमित्ताने डॉ.एम.पी.कुलथे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१०) **दिं.**१२ डिसेंबर २०१८ रोजी महाविद्यालयात 'मराठवाडयातील दुष्काळ व उपाय योजना' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकुण ४० विद्यार्थ्यांनी या मध्ये सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्री.राजरतन इंगोले, द्वितीय क्रमांक श्री.निलेश तपासे व तृतिय क्रमांक कु.पुजा जंजाळ ही मिळाला.

११) **दिनांक २५ जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला.** या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## समाज स्तरावरील उपक्रम

१) **दिं.०८ संप्टेबर २०१८** आतंर राष्ट्रीय साक्षरता दिना निमित्त आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड यांनी व्यसन मुक्तीची शपथ विद्यार्थ्यानां दिली. व युवकांनी व्यसन मुक्त होऊन बलशाली भारत बनवावा असे या प्रसंगी सांगिताले.

२) **दिं.०६ ऑक्टोबर २०१८** रोजी मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद, रा.से.यो. विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वच्छता मोहिम मिलिंद विज्ञान महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार सेवा योजनेचे विद्यार्थ्यांनी हिरीरीने सहभाग घेतला. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने या मोहिमेत सहभागी झाले.

३) **दि.२६ नोव्हेंबर २०१८** रोजी संविधान दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड यांनी भारतीय राज्यघटनेचे महत्व आणि आवश्यकता संबंधी मार्गदर्शन केले. राज्यघटनेच्या प्रियअंबलची विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शपथ देण्यात आली.

४) **दिं.६ डिसेंबर २०१८** रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वान दिना निमित्त डॉ. उत्तम अंभोरे, इंग्रजी विभाग प्रमुख, डॉ.बा.आं.म.वि. औरंगाबाद यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले.

५) **दिं.६ जानेवारी २०१९ रोजी** श्री.शहाजी भोसले अध्यक्ष अंधश्रध्दा निर्मुलन समिती औरंगाबाद यांचे अंधश्रध्दा निर्मुलन हया विषयावर मु.पो. शरणापुर येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला आणि ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

६) **दिं.८ जानेवारी २०१९ रोजी** मु.पो. शरणापुर येथे व्यसनमुक्ती व जनजागरण फेरी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केली होती.

७) **दिं.११ जानेवारी २०१९** रोजी महाविद्यालयात कृषी शास्त्रज्ञ डॉ.संजय पाटील यांचे शेती व्यवसायावर आधारीत व्यवसायिक मार्गदर्शन व प्रशिक्षण या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

८) **दिं.११ जानेवारी २०१९** रोजी डॉ.प्रिती दोशी, महिला रोग तज्ञ यांचे महाविद्यालयीन विद्यार्थीनीचे आरोग्य व निवारण हया विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थीनींच्या आरोग्य विषयक प्रश्नांना उत्तरे देवून मार्गदर्शन केले.

## **‘विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा’ दोन दिवशीय समुपदेशन व व्यक्तिमत्व शिबीर**

**दि.२२ व २३ जानेवारी २०१९ रोजी** आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि मिलिंद विज्ञान महाविद्यालय अतंर्गत दोन दिवसीय **‘विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा’** आयोजन करण्यात आले.

### **दि.२२ जानेवारी २०१९**

**सत्र पहीले –**

या कार्यक्रमाचे **उद्‌घाटन प्रा.डॉ.संजय मुन,** विभाग प्रमुख, आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांनी आपल्या बीज भाषणात सांगतांना विद्यार्थ्यांना आजीवन शिक्षण विस्तार सेवा योजनेचे महत्व समजावून सांगीतले. तसेच भारतीय शिक्षण पध्दती व पाश्चात्य शिक्षण पध्दती याच्यातील फरक सांगीतला. तसेच डॉ.अब्दूल कलाम यांच्या व्हिजन २०२० वर प्रकाश टाकला. तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी ध्येय निश्चिती व ध्येय प्राप्ती कशा प्रकारे साधता येईल या विषयावर विषयावर मार्गदर्शन केले.

**सत्र दुसरे -**

**डॉ.एस.डी.सरकटे** यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**सत्र तिसरे –**

**प्रा.संजय खंडारे,** - करिअर मार्गदर्शन आणि भारतीय राज्यघटणा या दोन विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या प्रगतीसाठी स्वतःमधील नकारात्म गुण कमी करुन स्वतःचा विकास करावा. भारतीय राज्यघटणा ही जगातील सर्वोत्तम राज्यघटणा आहे त्यामुळेच भारतातील लोक सुखी आणि समाधानी आहेत. असे विचार आपल्या व्याख्याना दरम्यान त्यांनी व्यक्त केले.

दिनांक २३ जानेवारी २०१९

**सत्र चौथे -**

**प्रा.संजय बिडवे, संचालक, बिडवे ज्ञान प्रबोधीनी ॲकॅडमी सिडको, औरंगाबाद** यांनी स्पर्धा परिक्षांना सामोरे जातांना या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी MPSC, UPSC आणि इतर स्पर्धा परिक्षेचे तयारी कशी करावी यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कुठल्याही परिक्षेची तयारी करतांना आगोदर ध्येय निश्चीत करावे व त्या दृष्टीने वाटचाल करावी म्हणजे यश लवकरात लवकर मिळेल. पदवी शिक्षणा दरम्यान स्पर्धा परिक्षेची तयारी कशी करावी वेळेचे व्यवस्थापन कसे ठरवावे.. स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना अभ्यासामध्ये नेहमी सातत्य असावे, एखादया वेळेस अपयश आले तर खचून न जाता प्रयत्न चालू ठेवावे व तसेच नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा. माणसाची निर्णय घेण्याची क्षमता उत्कृष्ठ असावी असे त्यांनी या वेळेस सांगितले

**सत्र पाचवे –**

**प्रा.अनिल सांगळे, डायरेक्टर सांगळे ॲग्रो फुड प्रोसेसिंग प्रा.लि. पैठण मेगा फुड पार्क, पैठण** यांची मुलाखत डॉ.ए.एस.मुंडे यांनी घेतली. मुलाखती दरम्याण उद्योग क्षेत्रामध्ये येणा-या विविध समस्या, अडचणी कशा सोडवाव्यात व विद्यार्थ्यांनी यशस्वी उद्योजक होण्या करीता काय करणे गरजेचे आहे असे वेगवेगळया प्रकारचे प्रश्न डॉ.ए.एस.मुंडे यांनी प्रा.अनिल सांगळे यास विचारले व त्यांनी सर्व प्रश्नांचे उत्तरे सोप्या भाषेमध्ये विद्यार्थ्यांना दिले व मार्गदर्शन केले.

डॉ.आर.ए.वाघमारे यांनी व्यक्तिमत्व विकास हा नोकरी मिळविण्यासाठी किती महत्वाचा असतो व व्यक्तिमत्व विकास होण्याकरीता विद्यार्थ्यांनी कशा पध्दतीने परिश्रम केले पाहीजे हे विषद केले. या कार्यक्रमाला डॉ.एम.पी.कुलथे उपस्थित होते.

**समारोप समारंभ -**

**डॉ.आनंद वाघ, सहाय्यक संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बा.आं.म.वि. औरंगबाद** यांनी विद्यार्थ्यांच्या तणांवाचे व्यवस्थापन हया विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी डॉ.वाघ सरांनी अतिशय अल्हाददायक वातावरण निर्मिती करुन तणावमुक्ती व तणाव व्यवस्थापण या बाबत मार्गदर्शन केले. या प्रसंगी समारोप भाषणात प्राचार्य

डॉ.एस.डी.राठोड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी गुणवत्तापुर्ण शिक्षण घेत असतांना व्यक्तिमत्व विकास साधावा. व स्वतःचे व्यक्तीमत्व चांगल्या प्रकारे घडवून देशाचा उत्तम नागरीक बनावे. शेवटी सहा विद्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या आवश्यकते संबंधी आपले मत व्यक्त केले.

(डॉ.के.एन.विधाटे)
कार्यक्रम अधिकारी
आजीवन व विस्तार विभाग
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

(डॉ.एस.डी.राठोड )
प्र.प्राचार्य
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद
PRINCIPAL
MILIND COLLEGE OF SCIENCE
AURANGABAD.

Eng Report list - } Ingle 23/02/2022

# मिलिंद विज्ञान महाविद्यालय, नागसेनवन औरंगाबाद
## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग
## वार्षिक अहवाल २०१९-२०

### महाविद्यालय स्तरावरील उपक्रम

१) **दिनांक २१ जून आतंरराष्ट्रीय योग दिवस –**
महाविद्यालयातील आजीवन विस्तार केंद्राचे सर्व स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत आतंरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ.एम.पी.कुलथे, डॉ. आर.एस.यन्नावार यांनी योगाची विविध अंगे प्रतिपादीत केले व प्रात्यक्षिक करुन घेतले.

२) **दिं.१ जूलै २०१९-**
या दिवशी सर्व स्वयंसेवकांनी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण केले व महाराष्ट्र शासनाच्या महत्वकांक्षी ३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमास हातभार लावला. यामध्ये नारळ, अंबा वृक्षांची लागवड करण्यात आली.

३) **दि. २४ जुलै २०१९ रोजी** विस्तार कार्यात सहभागी होण्यासाठी स्वंयसेवक विद्यार्थ्यांची नोंदणी सूरु केली. एकुण ५० विद्यार्थ्यांनी नोंद केली.

४) **दिं.१३ ऑगस्ट २०१९ -** आजीवन शिक्षण विस्तार विभाग, डॉ.बा.अ.म.वि. कार्यक्रम अधिकारी यांच्या बैठकी मध्ये सहभाग नोंदवीला.

५) **दिं.१६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१९ –**
स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहिम राबविली व जनजागृति केली.

६) **दिं.२३ ऑगस्ट विद्यापीठ वर्धापन दिन –**
विद्यापीठ वर्धापन दिना निमित्त ध्वजारोहण झाले. स्वयंसेवकांनी परिसरातील स्वच्छता केली.

७) **दिं.**२८ ऑगस्ट २०१९ रोजी आजीवन शिक्षण विस्तार विभाग, डॉ.बा.अ.म.वि. येथे एक दिवसीय कार्यशाळेत कु. शिवानी लहरे व कु.काळबांडे नेहा या विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला.

८) **दिं.१७/०९/२०१९ - मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन -**
या प्रसंगी स्वयंसेवक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले. मा.प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे महत्व विशद केले.

९) **दिं.१३/११/२०१९ -** माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन दिन म्हणून साजरा करण्यात आला. या निमित्ताने डॉ. आर.ए.वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१०) **दिं.१६ डिसेंबर २०१९ रोजी** महाविद्यालयात 'मराठवाडयातील दुष्काळ व उपाय योजना' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकुण ५० विद्यार्थ्यांनी या मध्ये सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु.शिवानी लहरे हीला मिळाला.

११) **दिनांक २५ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला.** या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### समाज स्तरावरील उपक्रम

१) **दिं.०८ संप्टेबर २०१९** आतंर राष्ट्रीय साक्षरता दिना निमित्त आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड यांनी व्यसन मुक्तीची शपथ विद्यार्थ्यांनां दिली. व युवकांनी व्यसन मुक्त होऊन बलशाली भारत बनवावा असे या प्रसंगी सांगिताले.

२) **दिं.०६ ऑक्टोबर २०१९** रोजी मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद, रा.से.यो. विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वच्छता मोहिम मिलिंद विज्ञान महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार सेवा योजनेचे विद्यार्थ्यांनी हिरीरीने सहभाग घेतला. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने या मोहिमेत सहभागी झाले.

३) **दि.२६ नोव्हेंबर २०१९** रोजी संविधान दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड यांनी भारतीय राज्यघटनेचे महत्व आणि आवश्यकता संबंधी मार्गदर्शन केले. राज्यघटनेच्या प्रियअंबलची विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शपथ देण्यात आली.

४) **दिं.०३ डिसेंबर २०१९ -** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना मिमित्त अदरांजलीपर रक्तदान शिबीर आयोजित मिलिंद विज्ञान महाविद्यालय, शासकिय रक्तपेढी औरंगाबाद व एसडीएफसी बॅक यांच्या संयुक्त विद्यमाने महापरिनिर्वाण दिनानिमित्त अदारांजलीपर रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदरील शिबीरात महाविद्यालयातील कर्मचारी, विद्यार्थी तसेच आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागचे स्वयंसेवक व एनएसएस स्वयंसेवक, एनसीसी छात्र यांनी सहभाग घेवून रक्तदान केले. सुमारे ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

५) **दिं.२० डिसेंबर २०१९ रोजी** श्री.शहाजी भोसले अध्यक्ष अंधश्रध्दा निर्मुलन समिती औरंगाबाद यांचे अंधश्रध्दा निर्मुलन हया विषयावर मु.पो. शरणापुर येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला आणि ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

६) **दिं.२६ डिसेंबर २०१९ रोजी** मु.पो. शरणापुर येथे व्यसनमुक्ती व जनजागरण फेरी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केली होती.

## ‘विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा’ दोन दिवशीय समुपदेशन व व्यक्तिमत्व शिबीर

**दि.१६ व १७ डिसेंबर २०१९ रोजी** आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि मिलिंद विज्ञान महाविद्यालय अतंर्गत दोन दिवसीय **‘विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा’** आयोजन करण्यात आले.

### दि.१७ डिसेंबर २०१९

**सत्र पहीले –**

या कार्यक्रमाचे **उद्घाटन प्रा.डॉ.संजय मुन,** विभाग प्रमुख, आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांनी आपल्या बीज भाषणात सांगतांना विद्यार्थ्यांना आजीवन शिक्षण विस्तार सेवा योजनेचे महत्व समजावून सांगीतले. तसेच भारतीय शिक्षण पध्दती व पाश्चात्य शिक्षण पध्दती याच्यातील फरक सांगीतला. तसेच डॉ.अब्दूल कलाम यांच्या व्हिजन २०२० वर प्रकाश टाकला. तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी ध्येय निश्चिती व ध्येय प्राप्ती कशा प्रकारे साधता येईल या विषयावर विषयावर मार्गदर्शन केले.

**सत्र दुसरे -**

**डॉ.आनंद वाघ, सहाय्यक संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बा.आं.म.वि. औरंगबाद** यांनी विद्यार्थ्यांच्या तणावाचे व्यवस्थापन हया विषयावर मार्गदर्शन केले. डॉ.वाघ सरांनी अतिशय अल्हाददायक वातावरण निर्मिती करुन तणावमुक्ती व तणाव व्यवस्थापण या बाबत मार्गदर्शन केले.

**सत्र तिसरे – डॉ.डि.डि.कायंदे, सहयोगी प्राध्यापक,** सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय, यांनी व्यक्तिमत्व विकास व नोकरीच्या संधी या वर मार्गदर्शन केले. या प्रसंगी रोजगार निर्मिती व नोकरीच्या संधी कशा मिळवाव्यात व त्या करीता कशी तयारी करावी याची माहिती विद्यार्थ्यांस दिली व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये नवी उर्जा भरण्याचे काम त्यांनी केले.

### दिनांक १७ डिसेंबर २०१९

सत्र चौथे -

**प्रा.संजय खंडारे,** - करिअर मार्गदर्शन आणि भारतीय राज्यघटणा या दोन विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या प्रगतीसाठी स्वतःमधील नकारात्म गुण कमी करुन स्वतःचा विकास करावा. भारतीय राज्यघटणा ही जगातील सर्वोत्तम राज्यघटणा आहे त्यामुळेच भारतातील लोक सुखी आणि समाधानी आहेत. असे विचार आपल्या व्याख्याना दरम्यान त्यांनी व्यक्त केले.

**सत्र पाचवे – डॉ.विद्याधर मरखेले, संचालक, एस.व्हि. लॅबोरेटरी, एमआयडीसी पैठण –**

यांची मुलाखत डॉ.ए.एस.मुंडे यांनी घेतली. मुलाखती दरम्याण उद्योग क्षेत्रामध्ये येणा-या विविध समस्या, अडचणी कशा सोडवाव्यात व विद्यार्थ्यांनी यशस्वी उद्योजक होण्या करीता काय करणे गरजेचे आहे असे वेगवेगळया प्रकारचे प्रश्न डॉ.ए.एस.मुंडे यांनी डॉ.विद्याधर मरखेले यास विचारले व त्यांनी सर्व प्रश्नांचे उत्तरे सोप्या भाषेमध्ये विद्यार्थ्यांना दिले व मार्गदर्शन केले.

**सत्र सहावे – समारोप सत्र**

**प्रा.श्रीहरी पाडव, संचालक, एनलाईट एज्युकेशन औरंगाबाद –**

यांनी स्पर्धा परिक्षांना सामोरे जातांना या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी MPSC, UPSC आणि इतर स्पर्धा परिक्षेचे तयारी कशी करावी यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कुठल्याही परिक्षेची तयारी करतांना आगोदर ध्येय निश्चीत करावे व त्या दृष्टीने वाटचाल करावी म्हणजे यश लवकरात लवकर मिळेल. पदवी शिक्षणा दरम्यान स्पर्धा परिक्षेची तयारी कशी करावी वेळेचे व्यवस्थापन कसे ठरवावे.. स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना अभ्यासामध्ये नेहमी सातत्य असावे, .एखादया वेळेस अपयश आले तर खचून न जाता प्रयत्न चालू ठेवावे व तसेच नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा. माणसाची निर्णय घेण्याची क्षमता उत्कृष्ठ असावी असे त्यांनी या वेळेस सांगितले या प्रसंगी समारोप भाषणात प्राचार्य डॉ.एस.डी.राठोड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी गुणवत्तापुर्ण शिक्षण घेत असतांना व्यक्तिमत्व विकास साधावा. व स्वत:चे व्यक्तीमत्व चांगल्या प्रकारे घडवून देशाचा उत्तम नागरीक बनावे. शेवटी सहा विद्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या आवश्यकते संबंधी आपले मत व्यक्त केले.

(डॉ.के.एन.विधाटे)
कार्यक्रम अधिकारी
आजीवन व विस्तार विभाग
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

(डॉ.एस.डी.राठोड )
प्र.प्राचार्य
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

Principal
Milind College of Science
Aurangabad